# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना** :- स्थायी समिती ठराव क्र. 19 दिनांक 16.06.2020 चे मान्यतेने नागपूर **{सामान्य प्रशासन विभाग}** महानगरपालिकेच्या मुख्यालय, क्षेत्रीय कार्यालय व इतर विभागामध्ये असलेली मालमत्ता, इमारतिची देखरेख व सुरक्षेकरीता महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ पुणे (MESCO) यांचेकडुन 03 पर्यवेक्षक व 81 सुरक्षा रक्षक घेणेस्तव करण्यात आलेल्या करारनाम्याची मुदत दिनांक 15.06.2023 रोजी पुर्ण होत आहे.

सदय स्थितीत नागपूर मनपा MESCO मार्फत 03 पर्यवेक्षक तथा 124 सुरक्षा रक्षकांची सेवा घेत आहे. पुढील दि. 16.06.2023 ते दि. 15.06.2026 पर्यत तिन वर्षाचे कालावधीकरीता शासनाचे किमान वेतन दर व इतर लागू असलेले भत्ते व वेळोवेळी शासनाची होणारी वाढ (विशेष भत्ते) प्रमाणे महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ, पुणे (मेस्को) यांना सुरक्षा रक्षक पुरविणेस मंजुरी व आवश्यकतेनुसार सुरक्षा रक्षकांचे संख्येत बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे व नविन कार्यादेश होईपर्यत शासनाचे किमान दर व भत्ता लागू असलेले सद्यास्थितीत अस्तित्वात असलेल्या भत्ते प्रमाणे व दर महिन्याला होणा-या रू. 35/- लक्ष व वार्षीक रू.425/- लक्ष व वेळोवेळी होणा-या वाढीव खर्चास मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

सन 2023-24 चे अर्थसंकल्पात पद क्र. 20 (A28300121904) अतंर्गत सुरक्षा व्यवस्था व्यय लेखा शिर्ष अतंर्गत रू. 1900 /- लक्ष खर्चाची तरतुद प्रस्तावीत आहे.
टिप- सविस्तर टिपणी नस्ति उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 351/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 17/04/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहाय्यक आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार स्थायी समिती ठराव क्र. 19 दिनांक 16.06.2020 चे मान्यतेने नागपूर महानगरपालिकेच्या मुख्यालय, क्षेत्रीय कार्यालय व इतर विभागामध्ये असलेली मालमत्ता, इमारतिची देखरेख व सुरक्षेकरीता महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ पुणे (MESCO) यांचेकडुन 03 पर्यवेक्षक व 81 सुरक्षा रक्षक घेणेस्तव करण्यात आलेल्या करारनाम्याची मुदत दिनांक 15.06.2023 रोजी पुर्ण होत आहे.

सदय स्थितीत नागपूर मनपा MESCO मार्फत 03 पर्यवेक्षक तथा 124 सुरक्षा रक्षकांची सेवा घेत आहे. पुढील दि. 16.06.2023 ते दि. 15.06.2026 पर्यत तिन वर्षाचे कालावधीकरीता शासनाचे किमान वेतन दर व इतर लागू असलेले भत्ते व वेळोवेळी शासनाची होणारी वाढ (विशेष भत्ते) प्रमाणे महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ, पुणे (मेस्को) यांना सुरक्षा रक्षक पुरविणेस मंजुरी व आवश्यकतेनुसार सुरक्षा रक्षकांचे संख्येत बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे व नविन कार्यादेश होईपर्यत शासनाचे किमान दर व भत्ता लागू असलेले सद्यास्थितीत अस्तित्वात असलेल्या भत्ते प्रमाणे व दर महिन्याला होणा-या रू. 35/- लक्ष व वार्षीक रू. 425/- लक्ष (सन 2023-24 चे अर्थसंकल्पात पद क्र. 20 (A28300121904) अतंर्गत सुरक्षा व्यवस्था व्यय लेखा शिर्ष अतंर्गत रू. 1900 /- लक्ष खर्चाची तरतुद प्रस्तावीत आहे) व वेळोवेळी होणा-या वाढीव खर्चास मंजुरी देण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**